* शेळी ८ तास चरत असेल तरी चाऱ्याची प्रत सामान्य ग्राह्य धरली आहे.
* बंदीस्त शेळीपालनामध्ये वजनदार जाती ग्राह्य धरल्या आहेत.
* हिरवा मका, द्वीदल धान्याच्या वेली, लुसर्ण घास इत्यादी प्रकारचा चारा असेल तर भाकड शेळ्यांना कमी खुराक लागेल.
* त्याचप्रमाणे खनिज मिश्रण दिवसाला २०-२५ ग्रॅम किंवा चाटण विट दिल्यास कळपांची स्थिती उत्तम राहू शकते.
* शेळीला दुध पिणारी दोन करडे असल्यास करडे दूध पिण्याच्या कालावधीत शेळीच्या आहारात ''कनक सिनिअर'' खुराकाची मात्रा १०० ग्रॅम तर दुध पिणारी तीन करडे असल्यास करडे दूध पिण्याच्या कालावधीत शेळीच्या आहारात ''कनक सिनिअर'' खुराकाची मात्रा २०० ग्रॅम नेहमीच्या खुराकापेक्षा वाढवून द्यावी.

शेळ्यांचा गाभण काळ १४५ ते १५० दिवसाचा असून त्यांचे दोन वितात सरासरी ९.५ महिने अंतर राहते. या गतीचा विचार केला तर दर दोन वर्षाला शेळीकडून २.५ विते मिळतात. व्याल्यानंतर पहिल्या ३ ते ३.५ महिन्यात आपल्या वितात एका करडास जन्म देणारी शेळी सरासरी ७० ते ७५ लिटर, दोन करडांस जन्म देणारी शेळी सरासरी १०० ते ११० लिटर तर तीन करडांस जन्म देणारी शेळी सरासरी १५० ते १७५ लिटर दूधाची निर्मित्ती करडांची पोषण गरज भागवण्यासाठी करत असते. जुळे व तिळ्याचे मिळून सरासरी ४० ते ५० टक्के प्रमाण असल्याने एका वर्षात शेळीच्या कळपात २.२ पेक्षा जास्त करडांचा प्रत्येक शेळीपाठीमागे जन्म होतो. कळपातील सर्व शेळ्यांना, विशेष करून वाढत्या करडांना आणि दुभत्या शेळ्यांना नियमितपणे २४ तास स्वच्छ पाणी पिण्यासाठी उपलब्ध होणे आवश्यक आहे. शेळ्या शिस्तबद्ध असतात त्यांना वेळच्या वेळी संतुलित खुराक व चारा देणे गरजेचे असते. शेळ्यांची व दुभत्या शेळ्यांची विशेष काळजी घ्यावी. गाभण पाटींची जोपासना काळजीपूर्वक करावी. शेळ्यांच्या कळपात प्रजनन कार्य उच्चतम ठेवण्यासाठी कळपात २० ते २५ शेळ्यांमागे एक नर असावा. दिवसभरात शेळ्यांचे किमान एक वेळ तरी बारकाईने निरीक्षण करावे. स्थानिक परिस्थितीनुसार कळपातील सर्व शेळ्यांचे गोचीड व जंत निर्मुलन दर तीन महिन्यांनी तसेच लसीकरण वेळचेवेळी करून घ्यावे. आजारी शेळ्यांना अलग करून पशुवैद्यकांच्या सल्ल्यानुसार औषधे द्यावीत.

''**कनक ज्युनिअर**'' व ''**कनक सिनीअर**'' हे खाद्य हिंदुस्तान फिड्सच्या सातारा, बारामती व श्रीरामपुर येथील कारखान्यात तसेच आपल्या नजीकच्या हिंदुस्तान फिडस् पशुखाद्य विक्रेत्याकडे मागणी केल्यास उपलब्ध होईल. हे खाद्य २५ किलोच्या आकर्षक प्लॅस्टीक बॅग पॅकींगमध्ये उपलब्ध आहे. अधिक माहितीकरिता ग्राहक सेवा क्रमांकावर संपर्क साधावा.

## शेळ्या, मेंढ्या व बोकडांसाठी सर्वोत्कृष्ठ आहार : 'कनक शेळीखाद्य'













**हिन्दुस्तान फीड्स**

**सातारा युनिट** एल-४, ॲडिशनल एम.आय.डी.सी., सातारा-४१५ ००४.
फोन : ०२१६२-२४०४७१/२/५
ग्राहक सेवा क्रमांक : ०२१६२-२४०७७३,
मोबा. ९४२२०३४०३०
ईमेल : marketing.str@hindustanfeeds.com

**बारामती युनिट** इ-२४८, एम.आय.डी.सी.बारामती, जि.पुणे ४१३ १३३.
फोन : ०२११२-२४३८३४, २४३६३४, २४३६८२
ईमेल : marketing.bmt@hindustanfeeds.com

**श्रीरामपूर युनिट** इ-५, एम.आय.डी.सी. श्रीरामपूर,जि.अहमदनगर ४१३ ७०९
मोबा. : ९८२२५३३३५७ / ७४४७७९५७४७
ईमेल : marketing.srm@hindustanfeeds.com

printom269@gmail.com / STR 02162-234049

**हिन्दुस्तान फीड्स**



पशुखाद्य निर्मितीमध्ये नं. 1

# शेळ्या, मेंढ्या व बोकडांसाठींचा सर्वोत्कृष्ठ आहार

करडं, धष्टपुष्ठ शेळ्या, मेंढ्या व बोकडांचे गमक...

# कनक

**करडं, शेळ्या, मेंढ्या व बोकडांसाठींचा सर्वोत्कृष्ठ आहार**



हिन्दुस्तान फीड्स




## कनक शेळीखाद्य : यशस्वी शेळी पालनातील महत्वाचा दुवा

शेळीच्या मटण मांसास तसेच दुधास दिवसेंदिवस मागणी वाढत असल्याने शेळी पालनाचे महत्व वाढत असून तो एक स्वतंत्र व्यवसाय म्हणून स्थिरावत आहे. त्यापासून मिळणारे उत्पादन विचारात घेवून शेळी पालकांची संख्याही वाढत आहे. मात्र शेळीपालनातून सध्या मिळत असलेल्या उत्पादन पातळीचा विचार करता त्यात सुधारणा व वृध्दी करण्यास वाव आहे. मोकाट, अर्ध बंदिस्त व पुर्ण बंदिस्त शेळी संगोपनाच्या तीन पध्दतीपैकी चराऊ व झाडाझुडूपांचा पाला देऊन मोकाट पध्दतीने केलेल्या संगोपनात मिळणारा फायदा बेताचा असल्याने अर्धबंदिस्त संगोपनाकडे शेळीपालकाचा कल वाढत आहे. या पध्दतीमध्ये शेळ्यांचा कळप ठराविक वेळ मोकळा सोडून दिवसाच्या इतर वेळेत बंदिस्त गोठ्यात त्यांचे संगापन केले जाते. शेळींची जीवन अवस्था, दुभती व गाभण स्थिती, वजन इत्यादी बाबी विचारात घेवून स्वच्छ पाणी हिरवा, सुका चारा व शेळी खाद्य असे आहार व्यवस्थापन केले जाते.

परंतु या संगोपन पद्धतीतसुध्दा शेळ्यांच्या आहाराला कमी महत्व दिले जात असून पारंपारिक पद्धतीने घरातील धान्य, गायी म्हैशींचे पशुखाद्य, पेंड, वेगवेगळ्या प्रकारच्या चुनींसारखे पदार्थ शेळीच्या आहारात दिले जातात. शास्त्रीय दृष्टीने शेळ्यांचा विकास व उत्पादनात वाढ होण्याच्या दृष्टीने संतुलित आहार पुरवणे गरजेचे असते.

या सर्व बाबींचा विचार करून खास शेळ्यांसाठी व करडांसाठी त्यांची शारिरीक रचना, रूची व उत्पादन वाढीची त्यांच्या व्यवस्थापनातील उद्दिष्ट्ये इत्यादी बाबी विचारात घेवून हिंदुस्तान फिडस्ने खास गोळी स्वरूपात 'कनक ज्युनिअर' हे खास करडांसाठी व ''कनक सिनिअर'' हे मोठ्या शेळ्यांसाठी खाद्य उपलब्ध केलेले आहे.

### ''कनक ज्युनिअर'' - करडांची जोमाने सुदृढ शरीर वाढ होण्यासाठी सकस व संतुलित आहार :

शेळीच्या नवजात करडांच्या सुरूवातीच्या आयुष्यात वयाच्या पहिल्या एक-दोन महिन्यात त्यांचे संगोपन शेळीच्या अंगावर दुध पाजून पोषण केले जाते. जन्मलेल्या करडांची वाढ ८ ते १० दिवसामध्येच वेग घेते. या दिवसामध्ये इतर अवयवांची वाढ बऱ्यापैकी होऊन ती कार्यान्वीत झालेली असतात. या काळापासून स्नायु (Muscle) व हाडांची वाढ गतीने होत असते, परंतु जसेजसे दिवस व वेळ जायला लागते तसा वाढीचा वेग राखण्यासाठी जास्त पोषण तत्वांची गरज वाढत जाते, परंतु त्याच वेळी आईचे दुध पचवणारे साधे पोट (Pre-ruminant) हे चार कप्प्यांच्या पोटांमध्ये (Rumen) बदलत असते, नेमक्या याच वेळी पोषण तत्वांच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे आणि आई पासून वेगळे होणाऱ्या तणावामुळे (Weaning Shock) करडांची वाढ खुंटते (Stunted growth) किंवा वाढीचा वेग खूपच कमी येतो.

बऱ्याच वेळा व्यवहारात असे आढळून आले आहे की दुध तूटीनंतर करडांना घरातील उपलब्ध चाळ, धान्ये इत्यादींचे तयार केलेले मिश्रण काही प्रमाणात किंवा गाईंचे पशुखाद्य किंवा शेळीचे पशुखाद्य इतर चाऱ्याबरोबर पुरवून बहुतेक शेळीपालक करडांची जोपासना करतात. करडांच्या पचनसंस्था या काळात पूर्ण वाढ झालेल्या शेळ्यांप्रमाणे विकसित झालेली नसल्याने वरील प्रकारचा आहार करडांना देणे अयोग्य आहे. किंबहुना अशा प्रकारे करडांच्या केलेल्या चुकीच्या आहार व्यवस्थापनामुळे त्यांचे पचनसंस्थेचे विकार वाढतात, आरोग्यावर विपरित परिणाम होतात. हे टाळण्यासाठी करडांना पचण्यायोग्य प्रथिनांची व खनिजांची योग्य प्रमाणात उपलब्धता होण्यासाठी उच्च पोषणतत्वे असणारा खुराक पुरवावा लागतो. जेणेकरून त्यांचा वाढीचा वेग सुधारतो व करडांना कमी कालावधीमध्ये योग्य ते वजन प्राप्त होते. यासाठी हिन्दुस्तान फीड्सने खास करडांसाठी **''कनक ज्युनिअर''** या खाद्याची निर्मिती केली आहे. या खाद्यामध्ये उच्च दर्जाची प्रथिने व अमिनो आम्ले (amino acids) आणि मुलभूत खनिजांची उपलब्धता तसेच करडांच्या पचन संस्थेला अगदी सहज पचणारे घटक व आवश्यक पोषण तत्वे पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून दिली आहेत. यामुळे करडांचा वाढीचा वेग सुधारतो व प्रतिदिन चांगल्या प्रमाणात वजनामध्ये वाढ होण्यास मदत होते. त्यामुळे करडांचे वयात येतानाचे वजन चांगल्या प्रकारे वाढते व विक्रीस लवकर तयार होते.

खाल्लेला खुराक अथवा चाऱ्याचे किफायतशीर पचन व शोषण होण्याच्या प्रक्रियेत करडांच्या शरिरातील पचनसंस्थेचा विकास व त्या संस्थेचे जोमाचे काम होणेसाठी योग्य ती आहार व्यवस्था करणे ही करडांच्या शरीर वाढीच्या संगोपनातील फार महत्वाची बाब आहे. करडांच्या संगोपनातील व योग्य शरिरवाढीसाठी उपरोक्त अति महत्वाच्या अपेक्षित बाबींचा विचार करून हिन्दुस्तान फिडसने दर्जेदार अन्नघटकांचा योग्य प्रमाणात वापर करून खास करडांच्या किफायतशीर शरीरवाढ व सदृढ आरोग्याकरीता **''कनक ज्युनिअर''** हा वैशिष्ट्यपूर्ण खुराक बनविला आहे. लहान करडांना त्यांच्या वयाच्या १५ दिवसानंतर हळूहळू थोड्या प्रमाणात **''कनक ज्युनिअर''** देऊन या खुराकाबाबत त्यांची आवड निर्माण करावी.

एक ते दीड महिने वयानंतर करडांची वाढ झपाट्याने होत असल्याने त्यांना **''कनक ज्युनिअर''** दिल्यास त्यांची योग्य शरीर वाढ होऊन विक्रीस लवकर उपलब्ध होतात.

### करडांच्या वयानुसार ''कनक ज्युनिअर'' खाद्याचे दैनिक प्रमाण खालील प्रमाणे :

| करडाचे वय | प्रतिदिन ''कनक ज्युनिअर'' ची मात्रा | लुसलुसीत चारा |
|---|---|---|
| १५-३० दिवस | हळू हळू वाढवत ३० दिवसापर्यंत ५० ग्रॅम | थोडासा करडास सवय लागण्यासाठी |
| ३१-६० दिवस | १००-१५० ग्रॅम | इच्छेप्रमाणे खाऊ द्यावा |
| ६१-९० दिवस | २००-२५० ग्रॅम | इच्छेप्रमाणे खाऊ द्यावा |

### ''कनक सिनिअर'' शेळीखाद्याची वैशिष्ट्ये :

ऊर्जा, प्रथिने, तेलवर्गिय पदार्थ, खनिजे व जिवनसत्वे या अन्नसत्वांचा संतुलित पुरवठा शेळ्यांना होऊन शरीराची वाढ, दुधोत्पादन व प्रजनन, रोगप्रतिकारक शक्ती इत्यादी कार्ये समाधानकारक होण्याच्या दृष्टीने दर्जेदार तेलबियांच्या पेंडी, मका, वेगवेगळी धान्ये, कडधान्ये व मोलॅसिससारखे कर्बोदके व उर्जा पुरविणारे पदार्थ, उत्तम प्रतिची खनिजे व जीवनसत्वे इत्यादीपासून तज्ञाच्या मार्गदर्शनाखाली, अनुभवी तंत्रज्ञांच्या देखरेखीखाली, अद्यावत यंत्रसामग्री असलेल्या पशुखाद्य कारखान्यात तयार केलेले हे संतुलित, पौष्टिक शेळी खाद्य आहे. हे खाद्य तयार करतेवेळी वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालाची गुणवत्ता व शेळीचा चोखंदळ स्वभाव विचारात घेऊन त्याप्रमाणे या खाद्याची निर्मित्ती केली जाते. या कनक शेळीखाद्याची शरीर वाढीवर होणाऱ्या परिणामाची पडताळणी श्री.बी.व्ही.निमकर यांच्या फलटण येथील शेळी फार्मवर वेगवेगळ्या जातींच्या व वयाच्या शेळ्यांवर चाचण्या घेऊन केली असता बोअर संकर जातीच्या नर आणि मादीमध्ये अनुक्रमे दैनिक सरासरी १६४ आणि ११९ ग्रॅम तर एका दिवसाची अधिकतम अशी २८० व १९१ ग्रॅम एवढी शरीरवाढ होत असल्याचे निकष मिळाले असल्याने या खाद्याचे शेळी ऊत्पादनातील महत्व सिद्ध झाले आहे.

### ''कनक सिनिअर'' शेळीखाद्याच्या वापरामुळे होणारे फायदे :

करडांची वाढ झपाट्याने होते. मादी पिलांचे पाटीत रूपांतर होऊन कमी वयात शरीराचा विकास होऊन माजावर येतात व गाभण राहतात. नर बोकडे झपाट्याने वाढल्याने त्यांची कमी वयात मांसासाठी विक्री करता येते. अशा कमी वयात बोकडाचे मांस कमी तंतूमय व चविष्ट असल्याने शेळीपालकास बाजारात फायदेशीर किंमत मिळते. वाढलेल्या शेळ्यांपासून नियमितपणे दुभते घेऊन त्यापासून जुळी व तिळी मिळण्याची शक्यता असते. संतुलित शेळी खाद्यामुळे त्यांच्यामध्ये रोगप्रतिकारशक्ती निर्माण होऊन कळपातील मरतुकीचे प्रमाण कमी होते.



### शेळीच्या वयानुसार ''कनक सिनिअर'' शेळीखाद्याचे दैनिक प्रमाण खालीलप्रमाणे :

| शेळीपालनाचा प्रकार | ४-१२ महिने वयाच्या पाटी व बोकडांकरिता | गाभण शेळी (शेवटचे २ महिने) | दुध देणारी शेळी | भाकड शेळी | बोकड |
|---|---|---|---|---|---|
| बंदिस्त शेळीपालन | ३००-४०० ग्रॅम | ३५०-४०० ग्रॅम | ३००-४०० ग्रॅम | १५०-२०० ग्रॅम | ५०० ग्रॅम |
| अर्ध बंदिस्त | २००-३५० ग्रॅम | ३५०-४०० ग्रॅम | ४०० ग्रॅम | १५०-२०० ग्रॅम | ५०० ग्रॅम |
| कमीत कमी ८ तास चरायला सोडत असतील तर | १५०-२०० ग्रॅम | ४००-४५० ग्रॅम | ४०० ग्रॅम | - | ५०० ग्रॅम |